सारांश (synopsis)

महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन- (1980 ते 2019)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

- : संशोधक :-

अभिजीत बाबासाहेब गोपाळघरे

लातूर

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. हरिश्चंद्र चौधरी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय,
लातूर

जून - २०१९

महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा राजकीय सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९)

प्रस्तावना:

आधुनिक काळात राजकारण हा परवलीचा शब्द आहे. तो फक्त निवडणूका, पक्षपध्दती, नेते मंडळी एवढ्यापुरताच मर्यादित नसून राजकारण म्हणजे सत्तासंघर्ष असतो. सत्ता प्राप्तीसाठी व्यक्ती-व्यक्तीत किंवा गटागटात संघर्ष असतात व त्यातून राजकारण निर्माण होते तर दुसऱ्या दृष्टीकोनातून राजकारण हे समन्वय साधण्याचे व व्यवस्था टिकवून ठेवण्याचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. राजकारण आधुनिक जगात सर्वांगिण उन्नतीचा एक मार्ग आहे. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात प्रत्येकाचा राजकीय सहभाग अत्यावश्यक असतो. कोणताही व्यक्ती, समाज, जात, धर्म, वर्ण, वंश राजकारणापासून अलिप्त राहू शकत नाही.

राजकीय सहभाग म्हणजे देशातील जनतेने राजकारणामध्ये सर्वच प्रकारांनी घेतलेला सहभाग असे सर्वसामान्यपणे म्हणता येते. राजकीय सहभाग ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे. राजकीय व्यवस्थेच्या प्रक्रियेमध्ये राजकीय सहभागाची समाविष्ट केलेली क्रिया ही अत्यंत महत्त्वाची आहे. व्यक्ती विविध पातळीवर आपला सहभाग हा व्यक्त करीत असतो. लोकांच्या सहभागाच्या प्रमाणावरुन त्या त्या देशाचे राजकीय व्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट होते. राजकीय सहभाग म्हणजे राजकारणात समाजात होणारे सामाजिकरण होय. राजकीय सामाजिकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्तीमध्ये राजकीय चेतना निर्माण होते. परिणामी व्यक्ती राजकारणात सक्रिय होतात.

लोकशाही शासन व्यवस्थेत लोकांचा सहभाग मोठया प्रमाणात असतो. लोकशाही शासन हे सहभागी स्वरुपाचे शासन असते. अशा शासनात सर्व नागरिकांचा राजकीय सहभाग सारखाच राहिल असे नाही. कारण राजकीय सहभागावर सामाजिक, शैक्षणिक,

आर्थिक, सांस्कृतिक या आणि अशा अनेक घटकांचा परिणाम होत असतो. लोकशाही व्यवस्था निर्माण होण्यापूर्वी राजकीय सहभाग काही व्यक्तीपुरता मर्यादित होता. लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणूका हे सर्वात महत्त्वाचे अंग बनले आहे.

भारत हा देश अनेक जाती, धर्म, वर्ण वंश यांची समन्वयक भूमी आहे. भारतातील राजकारण काही धर्म-जातीनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यापैकी एक मराठवाड्यातील वंजारी समाज आहे. वंजारी समाजाचा प्रभाव महाराष्ट्र व मराठवाड्यातील राजकारणांवर मोठया प्रमाणात दिसून येतो. यामध्ये केंद्रीय मंत्र्यापासून महानगरपालिका, नगरपालिका, जि.प. आदी स्तरापर्यंत वंजारी समाजाचे राजकीय नेतृत्व आजपर्यंत निर्माण झाल्याचे दिसून येते.

वंजारी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

वंजारी समाजाची उत्पत्ती ही रेणूकादेवीच्या शरीरापासून झाली असे मानले जाते. रेणूका माता आणि जमदग्नी ऋषी यांना पाच पुत्र होते, ते अनुक्रमे वशूमंत, वस्तू, सुशौज, विश्वस्तू व परशूराम हे होत. वशुमंतापासून कमण्डूक ऋषींना अनुक्रमे रघूपती, अधिपती, कानुपती आणि सुभानुपती हे पुत्र झाले. यातील रघुपतीपासून रावजीन, अधिपती पासून लाडजीन, कानिपती पासून मधुरजन व सुभानुपती पासून भूसारजीन. अशा चार शांखाची उत्पत्ती झाली. आज या चारही शाखा एक आहेत व त्या वंजारी म्हणून परिचित आहेत.

महाराष्ट्रातील स्थिती :

वंजारी ही महाराष्ट्रातील हिंदू धर्मातील एक जात आहे. महाराष्ट्रात वंजारी समाज भटक्या जमाती-ड (NT-D) मध्ये वर्गीकृत केला आहे. आज महाराष्ट्रातील मुठभर गर्भश्रीमंत लोक सरकारी अधिकारी, कर्मचारी, व्यवसायिक सोडले तर वंजारी समाजाची अवस्था अवांच्छित समाज घटक अशी बनली आहे. चार पोटजातीत विभागलेला हा वंजारी समाज संत श्री भगवानबाबा व स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रयत्नाने संघटीत झाला आहे.

वंजारी समाज हा मराठवाड्यात प्रामुख्याने बीड जिल्हयात अधिक आढळतो, तसेच संपूर्ण महाराष्ट्रात ही विविध जिल्हयात आपणास दिसून येतो. संपूर्ण महाराष्ट्राला वंजारी समाज हा ऊसतोड कामगार म्हणून परिचित आहे. शंकरराव राख, पंडीतराव दौंड, स्व. गोपीनाथराव मुंडे, बबनराव ढाकणे, गोविंद अण्णा केंद्रे, जितेंद्र आव्हाड यांच्यामुळे या समाजाला विशिष्टि अशी राजकीय ओळख प्राप्त झाली आहे.

संशोधन विषय निवडीची भूमिका :

संशोधनासाठी महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९) हा विषय निवडला आहे. कारण संशोधक हा मराठवाड्यातील रहिवासी असून त्याचा समावेश वंजारी समाजात होतो. व एक राजकीय अभ्यासक म्हणून आजपर्यंत या विषयावर संशोधन कार्य झालेले नसल्यामुळे हा विषय निवडला आहे. तसेच मराठवाड्याच्या राजकारणात मराठा व वंजारी या दोन जातीचे वर्चस्व दिसून येते. त्यामध्ये वंजारी समाजावर संशोधन झाले नसल्यामुळे हा विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये:

राज्यशास्त्राचा अभ्यासक म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९) या विषयावर अध्ययन करण्याची आवश्यकता वाटली. व यावरील संशोधन झाले नसल्यामुळे संशोधनासाठी हा विषय निवडला त्याची उद्दिष्टये पुढील उद्दिष्ट निश्चित करण्यात आली आहेत.

१. महाराष्ट्राच्या राजकारणातील विविध समाजाचा सहभाग अभ्यासणे.
२. महाराष्ट्रातील महिलांच्या राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील वंजारी समाजातील लोकांचा राजकीय सहभागाचा अभ्यासण करणे.
४. वंजारी समाजातील लोकांमध्ये राजकारणाविषयी जाणीव व भूमिका यांचा अभ्यास करणे.
५. वंजारी समाजातील राजकीय नेतृत्वाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितके :

संशोधन कार्य योग्यपध्दतीने होण्यासाठी व एक निश्चित मार्ग निर्माण करण्यासाठी संशोधनाची पुढील गृहितके निश्चित करण्यात येणार आहेत.

१. भारतीय राजकारणात विविध समाजाने सहभाग दिला आहे.

२. वंजारी समाज हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकारणाशी संबंधित आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्था ते केंद्रीय पातळीवर वंजारी समाजाने सक्रिय सहभाग नोदंविलेला आहे.

४. महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाची राजकीय भूमिका महत्त्वाची आहे.

५. वंजारी समाज वेगवेगळ्या चळवळीत अग्रेसर आहे.

संशोधन पध्दती :

शोध प्रबंधाचा विषय महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९) हा आहे. प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. जसेच वंजारी समाजाशी संबधित लिखित साहित्य, ग्रंथ, शासकीय अहवाल, मासिके, दैनिक वृत्तपत्रे, इंटरनेट, निवडणूक अहवाल या सारख्या दुय्यम तथ्य संकलन साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच संशोधन कार्य प्रभावी होण्यासाठी प्राथमिक तथ्य्य संकलन करण्यासाठी मुलाखत प्रश्नावली यांचा उपयोग करण्यात येणार आहे. यामध्ये

सामाजिक संशोधनासाठी जास्तीत जास्त माहिती ही मुलाखतीद्वारे भेटत असते त्यामुळेच मुलाखत हे तंत्र माहितीचे संकलन करण्यासाठी उपयोगात आपले जाणार आहे. संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून त्याच्याशी संबंधित विषयावर चर्चा करुन माहिती मिळविणे या तंत्राला मुलाखत म्हणतात. प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाड्यातील वंजारी समाजाचे नेते, पंचायत समिती, जिल्हापरिषद, विधिमंडळ,

संसद या स्तरावरील प्रतिनिधींची व राजकीय कार्यकर्ते, नागरिक यांची मुलाखत घेऊन तथ्य्य संकलन केले जाणार आहे.

प्रस्तुत सामाजिक संशोधनात विश्लेषणात्मक व वर्णानात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. यामध्ये संबंधित संशोधन घटकांचे निरीक्षण, मुलाखत व प्रत्यक्ष पाहणीच्या माध्यमातून तथ्यांचे विश्लेषण व वर्णन करण्यात येते. त्यातून प्राप्त तथ्यांच्या आधारे योग्य ते निष्कर्ष काढण्यात येणार आहेत.

संशोधन क्षेत्र:

महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९) या विषयासाठी महाराष्ट्र राज्य निवडला असून यामधील काही प्रातिनिधिक जिल्हयांचा समावेश आहे. त्यातील बीड, लातूर, अहमदनगर जिल्हयात वंजारी समाजाची संख्या अधिक आहे. त्यामुळे या जिल्हयांना केंद्र मानून संशोधन कार्य केले जाणार आहे.

प्रकरण मांडणी :

महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९) या संशोधन विषयाचा पुढील सात प्रकरणांमध्ये विभाजन करण्यात येणार आहे.

प्रकरण- १ ले

प्रस्तावना व संशोधन पध्दती

संशोधन प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात अभ्यासविषयाची पार्श्वभूमी, राजकीय सहभाग संकल्पना इत्यादीचा आढावा घेऊन संशोधन पध्दतीचा आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टये, गृहितके, तथ्यसंकलन, नमुना निवड, संशोधन साहित्याचा आढावा याचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण - २ रे

वंजारी सामाजाची पार्श्वभूमी :

प्रस्तुत प्रकरणात वंजारी समाजाची महाराष्ट्रातील सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, स्थितीचा व राजकीय पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे

वंजारी समाजाचा स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय सहभाग

महाराष्ट्रातील पंचायतसमिती, जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिका यामधील वंजारी समाजाच्या राजकीय सहभाग व नेतृत्वाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ वे

वंजारी समाजाचा राज्यपातळीवरील राजकीय सहभाग

प्रस्तूत प्रकरणात राज्य पातळीवरील महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा राजकीय सहभागाचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य विधिमंडळातील (विधानसभा व विधान परिषद, मंत्रिमंडळ, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेता) वंजारी समाजाचा सहभाग व दिलेले योगदान याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण ५ वे

वंजारी समाजाचा केंद्रीय स्तरावरील राजकीय सहभाग

प्रस्तुत महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा राष्ट्रीय पातळीवरील म्हणजेच संसद (लोकसभा व राज्यसभा) येथील सहभागाचा व योगदानाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे निष्कर्ष व शिफारशी

संशोधनाच्या या अंतिम प्रकरणात केलेल्या अभ्यासावरुन निष्कर्ष काढले जाणार आहेत तसेच काही शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ सूची :

१. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.

२. डॉ. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन तंत्र व पध्दती, विद्याबुक्स प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. वा.बा. पाठील, संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१२.

४. शहा घनश्याम, सामाजिक चळवळी आणि सरकार, डायमंड प्रकाशन, पुणे, २००६.

५. संजीव कुलकर्णी, संघर्ष यात्री, अंभग प्रकाशन,२०१६

६. इमानदार, राजकीय समाजशास्त्र.

७. मायावती सोसे, सर्वात्म वंजारी, गणराज पब्लिकेशन, अहमदनगर.

८. डॉ. यशवंत वळवी, आदिवासी भिल्ल समाज आणि राजकीय सहभाग, संकल्प प्रकाशन, लातूर, २०१५.

९. लोकराज्य

१०.दैनिक लोकमत,

११.दैनिक लोकसत्ता.

१२.इंटरनेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. हरिश्चंद्र चौधरी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय,

लातूर

संशोधक

अभिजीत बाबासाहेब गोपाळघरे

लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाचा राजकीय सहभाग : एक अध्ययन (१९८० ते २०१९)

संशोधकाचे नाव :- ***अभिजीत बाबासाहेब गोपाळघरे***

विषय : *राज्यशास्त्र*

मो. नं.: *७०२०७३८७९७*

प्रवर्ग : *NT-D, (वंजारी)*

पत्ता : *अंबाजोगाई रोड, लातूर.*

ई-मेल : agopalghare@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव : ***प्रा. डॉ. हरिश्चंद्र चौधरी***

महाविद्यालयाचे नाव : राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय,
लातूर

मो. न. : ८०८७४१६९२१

ई-मेल : harischandrachaudhari@gmail.com